आधुनिक विचारांचे

# वर्तमान

बीड । गुरुवार, १५ जुलै २०२१ । वर्ष : ३ आपले वृत्तपत्र, आपला आवाज अंक : ३८ । पाने : ४ । मूल्य २ ₹

## भाजप सोडण्याचा प्रश्नच नाही!

मुंबई : भाजपचे सर्वोच्च नेते नरेंद्र मोदी, अमित शाह, जे.पी.नड्डा यांच्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. भाजप मला घरासारखे आहे. भाजप सोडण्याचा प्रश्न नाही, असे स्पष्टीकरण भाजपच्या राष्ट्रीय सचिव तथा माजी मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांनी मंगळवारी माध्यमांशी बोलताना दिले.

सविस्तर वृत्त : पान ३ वर





संपादकीय

## जगण्याचे बळ देणारी वारी

वारकऱ्यांसह भक्तगणांना समृद्ध करणारी पंढरीची वारी आहे. समाधान शोधावे तर वारीत, वारीत चालणारा गावखेड्यातला, शेतकरी कुटुंबातला माणूस समाधानी वृत्ती सोबत घेऊन चालत असतो. इथे भक्तीचे प्रदर्शन नसते. परमेश्वर आपल्या पदरात काही दान टाकेल, अशी अपेक्षाही नसते. देव भावाचा भुकेला असतो आणि हाच भाव जपत हजारो जण पंढरीची वारी करतात. कोरोनामुळे यंदाही पायी वारी अनुभवता येणार नसली तरी वारीतली सकारात्मकता जगण्याचं बळ देत राहणार आहे. पंढरीची वारी हा अभूतपूर्व सोहळा. वर्षानुवर्षे, शतकानुशतके वारीची ही परंपरा अखंड सुरू आहे. आकाशातून जलधारा बरसू लागल्यावर वारीचे वेध लागायला सुरूवात होते. गावोगावच्या वारकऱ्यांना विठुरायाच्या दर्शनाची आस लागते. पालखी प्रस्थानाची लगबग सुरू होते. वारी हा महाराष्ट्राचा, भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. एरवी जातीपातीत विखुरलेला आपला समाज वारीच्या निमित्ताने एकत्र येतो. परमेश्वर सर्वांचा आहे आणि आपल्या प्रत्येकात परमेश्वराचा अंश आहे, हीच वारीची शिकवण म्हटली पाहिजे. भगवंताच्या भेटीच्या आशेने झरझर पावले टाकणाऱ्या वारकऱ्यांच्या चेहऱ्यावरचे तेज पाहून आपणही हरखून जातो. वारीतला प्रत्येक भक्त निरपेक्ष वृत्तीने चालत असल्याचं आपल्याला दिसून येते. वारीत विठुरायाच्या नामाचा गजर अखंड सुरू असतो. जय हरी विठ्ठल' असे म्हणणाऱ्या वारकऱ्याच्या अंगी निराळी शक्ती संचारलेली असते. एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ या उक्तीचे अनुकरण करत विठुरायाच्या नगरीपर्यंतचे अंतर पार केले जाते. माझे माहेर पंढरी, आहे भीवरेच्या तीरी हीच भावना प्रत्येक वारकऱ्याच्या मनात असते. प्रत्येकाने आयुष्यात एकदा तरी वारी अनुभवायला हवी. वारीचे व्यवस्थापन भल्याभल्यांना अचंबित करणारे. इथे ठरवून काही केले जात नाही. सगळा भार त्या कर्त्याकरवित्या पांडुरंगाच्या खांद्यांवर टाकला जातो. खरे तर तोच सगळं निभावून नेत असतो. अनेक भक्त आषाढीला कळसाचं दर्शन घेऊन माघारी फिरतात. कारण पुढील वर्षी त्यांना विठुरायाच्या दर्शनाची आस टिकवून ठेवायची असते. मंदिराच्या कळसातच त्यांना पांडुरंग दिसत असतो. समाधान कुठे शोधायचं, तर वारीत शोधायचे. वारीत चालणारा गावखेड्यातला, शेतकरी कुटुंबातला माणूस समाधानी वृत्ती सोबत घेऊनच चालत असतो. इथे भक्तीचे प्रदर्शन नसते. परमेश्वर आपल्या पदरात काही तरी दान टाकेल, अशीही अपेक्षा नसते. देव भावाचा भुकेला असतो आणि हाच भाव जपत वारकरी पंढरीची वारी करत असतो. वारकऱ्यांच्या अनेक पिढ्या या वारीत दिसतात. वारीची परंपरा सुरू ठेवण्याची जबाबदारी पुढची पिढी अंगावर घेत असते. गेल्या वर्षी कोरोनामुळे पायी वारी झाली नाही. माऊली आणि तुकाराम महाराजांच्या पादुका एसटीने पंढरपुरात दाखल झाल्या. तो अनुपम असा पालखी सोहळा, गोल रिंगण, उभे रिंगण, माऊलींचा अश्व या सगळ्याला आपण मुकलो. यंदाही परिस्थिती बदललेली नाही. कोरोना आहे आणि आपल्या सण-उत्सवांवर त्याची काळी छाया पडली आहे. त्यामुळे यंदाही पादुका विशेष वाहनाने पंढरपुरात दाखल होतील. अर्थात वारीवर आलेले हे काही पहिले संकट नाही. याआधीही दुसरे महायुद्ध, प्लेग तसेच अन्य आजारांच्या साथींदरम्यान वारी साधेपणाने झाली होती. यंदाही वारकऱ्यांना विठुरायाची प्रत्यक्ष भेट घेता येणार नाही. विठुमाऊली प्रत्येक वारकऱ्याच्या मनात आहे. त्यामुळे घरून केलेला नमस्कार विठू माऊलीपर्यंत नक्कीच पोहोचणार आहे. वारीने कायमच सकारात्मकता जपली आहे. त्यामुळे कोरोनाचे संकटही टळणार आहे आणि वारीचा हा सोहळा पुन्हा एकदा अनुभवणार आहोत. अर्थात यासाठी थोडी वाट मात्र बघावी लागणार आहे. माऊलीच्या पालखीचे मूळ सत्पुरुष हैबतबाबा आरफळकर यांच्या सेवेतून वारीची प्रथा सुरू झाली. ग्वाल्हेरच्या शिंदे सरकारच्या पदरी असलेल्या सेनाधिकाऱ्यांनी माऊलीचा कृपाप्रसाद झाला म्हणून ज्ञानदेवांच्या पादुका डोक्यावर घेऊन पंढरीच्या वारीला जाण्याची प्रथा सुरू केली. त्यानंतर बेळगाव-अंकलीचे सरदार शितोळे यांनी या कार्याला पालखी, घोडे, तंबू, अबदागिरी, माऊलीच्या मुक्कामासाठी शामियाना अशा गोष्टी देऊन सोहळ्याचे रूप दिले. वासकरांच्या फडातून टाळकऱ्यांची पहिली दिंडी तयार झाली. नंतरच्या काळात हे स्वरूप अफाट झाले. माऊलीच्या रथापुढे सुमारे दीड-दोन लाख वारकरी, पालखीपुढे २६ तर मागे सुमारे १५० नोंदवलेल्या दिंड्या आणि त्यामागे नोंदणी नसलेल्या अनेक दिंड्या, डोक्यावर तुळशी वृंदावन घेतलेल्या भाविक महिला, त्यामागे मुक्कामाची सोय असणारे सामानांचे ट्रक असं वैभवी आणि प्रचंड स्वरूप या सोहळ्याला प्राप्त झालं. संत तुकारामांच्या परंपरेप्रमाणे इ.स.१६८५मध्ये त्यांच्या चिरंजीवांनी म्हणजे नारायण महाराजांनी ज्ञानोबा-तुकारामाच्या पादुका पालखीतून पंढरपूरला नेण्याची प्रथा सुरू केली. पुढे त्यांची व्यवस्था वेगळी झाली. माऊलीप्रमाणेच संत तुकारामांच्या पालखी सोहळ्यातही अनेक दिंड्या सहभागी झाल्या. या पालख्या वेगळ्या मार्गाने पंढरपूरकडे रवाना होताता. पंढरपूरपासून वीस किलोमीटर अंतरावर वाखरी गावी सद्गुरू सीताराम महाराजांचे समाधीस्थान आहे. या ठिकाणी आषाढ शुद्ध नवमीला सर्व संतांच्या पालख्या एकत्र येतात. दशमीला सायंकाळी पंढरपूरमध्ये प्रवेश करतात. संत नामदेवरायाची पालखी सर्व संतांचे स्वागत करण्यासाठी पंढरपूरमधून वाखरीला सामोरी येते. वाखरीला निवृत्तीनाथ, सोपानदेव, मुक्ताबाई, एकनाथ, चोखोबा, गोरोबा, सावतोबा आदी संतांच्या पालख्या हजर होतात. एकदातरी वारी अनुभवावी हा संदेश वारकरी आम्हाला देतात. त्यातून आत्मिक समाधान मिळते.

# कर्तृव्य आणि वक्तृत्वाचा झरा

**महाराष्ट्राच्या जडणघडणीत ज्यांचे अमुल्य योगदान आहे. ज्यांच्या संस्कारातून अनेक पिढ्या घडल्या ते प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचा १५ जुलै हा जयंतीदिन त्या अनुषंगाने शिवाजीराव भोसले यांचे नेतृत्व, कर्तृत्व आणि वक्तृत्व यावर प्रकाश टाकणारा हा विशेष लेख वर्तमानच्या वाचकांसाठी देत आहोत.**

व्यक्तीविशेष

डॉ.चत्रभुज कदम





प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचा जन्म १५ जुलै १९२७ रोजी सातारा जिल्ह्यातील कलेढोण या गावी सर्वसामान्य कुटुंबात झाला. वडील अनंतराव व आई अनसूयाबाई यांना एकूण पाच मुले व एक मुलगी होती. त्यापैकी शिवाजीराव हे पाचव्या क्रमांकाचे अपत्य होते. अनंतराव हे प्राथमिक शिक्षक होते. अनंतरावांच्या पूर्वी भोसले घराण्यात कोणीही शिकलेले नव्हते. परंतु त्यांनी गोपाळ रामचंद्र कुलकर्णी या मुख्याध्यापकाकडे खासगी शिकवणी लावून शिकले. यामुळे आपल्या वाटयाला आलेले दुःख मुलांच्या नशिबी येऊ नये यासाठी ते अतीशय दक्ष असत. तर शिवाजीरावाच्या आई हया जरी शिक्षणाने अल्पशिक्षित असल्या तरी संस्काराने सुशिक्षित, तत्वनिष्ठ, ध्येयवादी, कर्तव्यदक्षी, अशा होत्या. अशा सुज्ञ आई-वडिलांच्या छत्रछायेत ही मुले घडत होती. शिवाजीरावांच्या वडिलांवर महात्मा फुले, छत्रपती राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा प्रभाव असल्याने त्यांनी चांगदेव खैरमोडे या विद्वान लेखकाच्या मैत्रितून आपल्या मुलाचे पाळण्यातील नाव बदलून बाबासाहेब ठेवले. ते पुढे आधुनिक पुरोगामी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. तर दुस-या मुलास ते प्रेमाणे सागरू' म्हणत असत त्याचेही नाव त्यांनी बदलून शिवाजी' असे ठेवले. ते पुढे ज्ञानाच्या अथांग सागराप्रमाणे संपूर्ण महाराष्ट्रभर प्राचार्य शिवाजीराव भोसले म्हणून प्रसिध्द झाले. कलेढोण सारख्या गावातून प्राथामिक शिक्षण घेतल्यानंतर पुढील शिक्षणासाठी ते सातारा, कोल्हापूर, पुणे येथे गेले. कर्मवीर भाऊराव पाटलांनी सुरू केलेल्या वसतिगृहात स्वावलंबना बरोबरच निसर्गभ्रमण, चिंतन आणि मनन याचे धडे गिरविले. उपजतच विद्यार्थीदशेपासून चौफेर वाचनाची आवड असल्याने दोन रूपये डिपॉझिट व दरमहा चारआणे वर्गणी भरून वाचनालयातील ग्रंथ घरी आणून वाचीत. सर्व प्रथम स्वामी विवेकानंदाचे राजयोग' हे पुस्तक ग्रंथपालाने दिले असता त्यामध्ये वाचलेले प्राणायाम, आसन, ध्यान, धारणा, यम, नियम आणि समाधी हे सूत्र आपल्या जीवनात अखंडपणे आचरणात आणले. रामकृष्ण परमहंस, वेदमहर्षि सातवळेकर, योगासने, स्वामी विवेकानंद इ.वाचनाच्या आवड आणि चिंतनातूनच त्यांचा पिंड घडत गेला. शालेय शिक्षण संपल्यानंतर पदवी शिक्षणासाठी त्यांनी वडिलांच्या ईच्छेविरूध्द कला शाखेतील तत्वज्ञान, मानसशास्त्र व तर्कशास्त्र हे विषय निवडले. डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे कलकी ऑफ दि फ्यूचर ऑफ सिव्हिलायझेशन', पंडित नेहरू यांचे डिस्कव्हरी ऑफ इंडिया', लोकमान्य टिळक यांचे गीतारहस्य', आणि साने गुरूजी यांच्या संस्कृतीचे रहस्य' या पुस्तकांचा त्यांच्यावर प्रभाव पडलेला दिसून येतो. साधी राहाणी व उच्च विचार सरणीने ते राहात होते. पुण्यातील एस.पी.कॉलेज, साहित्य परिषद, शिवाजी मंदिर, टिळक स्मारक मंदिर या ठिकाणी ते वक्तृत्वाची भाषणे ऐकण्यासाठी आवडीने जात असत. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, पंडित नेहरू, नाना पाटील, आण्णासाहेब लठ्ठे, मामासाहेब देवगिरीकर, बॅ.मेहेता, ना.ग.गोरे, प्रा.ना.सी.फडके, प्रा.गं.बा.सरदार, अच्युतराव पटवर्धन, बाळशास्त्री हरदास, प्राचार्य सोनोपंत दांडेकर, प्रा.प्र.रा.दामले, प्रा.श्री.म.माटे, डॉ.पु.ग.सहस्त्रबुध्दे, डॉ.रा.शं.वाळिंबे, डॉ.धनंजयराव गाडगीळ, प्रा.अय्यर, डी.डी. वाडेकर, आचार्य स.ज.भागवत, आचार्य जावडेकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, साने गुरूजी,मानवेंद्रनाथ रॉय, बॅ.जयकर, डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन, श्यामाप्रसाद मुखर्जी, एम्.एन्.रॉय, सी.व्ही.रामन, गार्डीनर मर्फी, नाथ पै, भाई डांगे, श्री.मो.रा.वाळंबे, व.वि.अकोलकर, न.चिं.केळकर, जे.कृष्णमूर्ती, मनोहरपंत केळकर, गोपीनाथ तळवलकर, श्री.के.क्षीरसागर, कवी यशवंत, इ. तत्वज्ञांच्या भाषणातून शिवाजीरावांच्या मनाची,चिंतनाची बैठक पक्की होत होती. त्यांना भोजनापेक्षा ज्ञानतृप्तीची साधना महत्त्वाची वाटत असे. खेळकर व खोडकर वृत्ती असल्याने अधून-मधून प्राध्यापक मंडळीचीही नक्कल करीत यामुळे मित्र मंडळीकडून त्यांच्या खिलाडूवृत्तीला चांगली दाद मिळत असे. शिवाजीरावांनी कायद्याची पदवी घेतल्यानंतरही त्यांना वकिली व्यवसाय आवडत नसल्याने एम.ए.(तत्वज्ञान) या विषयाची पदवी घेऊन इ.स.१९५७ साली फलटण येथील मुधोजी महाविद्यालयात प्राध्यापक झाले. प्राध्यापकाने कसे वाचावे, किती वाचावे आणि अध्ययन-अध्यापन कसे करावे याचा आदर्श म्हणजे त्यांची दिनचर्या होय. ते म्हणत अध्यापक हा विद्यार्थी परायण असला पाहिजे. विद्यार्थी ज्ञानपरायण असला पाहिजे आणि ज्ञान सेवा परायण असले पाहिजे'. यामुळेच ते विद्यार्थीप्रिय प्राध्यापक झाले होते. शिवाजीरावांचा विवाह प्रांत अधिकारी श्री.आर.वाय.सावंत यांच्या सुशीलाताई' या सुकन्येशी दि. १० मे १९५८ रोजी कर्मवीरांच्या साक्षीने शाहू बोर्डींग मध्ये झाला. सुखवस्तू सुशीलाताई'ने एका ध्येयवादी, वाचनवेडया प्राध्यापकाची पत्नी म्हणून मोठया धैर्याने कुटुंबाची धुरा सांभाळली, त्यामुळेच ते प्राध्यापक पदापासून कुलगुरू पदापर्यंतची मजल गाठू शकले. आपल्या संसारमय जीवनात अंजली' आणि संजीव' या दोन मुलांना बापूं'ची छाया कमी मिळत असली तरी हृदयातील माया भरपूर प्रमाणात मिळत असे.

प्राचार्याच्या वक्तृत्वाला खरा बहर आला तो पुण्यातील वसंत व्याख्यान'मालेतील स्वामी विवेकानंद जन्मशताब्दी (१९६३) आणि योगी अरविंद जन्मशताब्दी (१९७२) महोत्सवात. याशिवाय त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, स्वातंत्र्यवीर सावरकर, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील व संत परंपरेतील संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, समर्थ रामदास या विषयावर आत्मियतेने व्याख्याने देत असत. त्यांनी आपल्या मुक्त कंठाच्या स्वर मालिकेतून एका एका व्याख्यान मालेच्या माध्यमातून मौल्यवान शब्दरत्नांचा प्रवाह एखद्या नितळ खळखळणाऱ्या झऱ्याप्रमाणे प्रवाहीत केला. प्राचार्यांनी आपल्या वाणी'चा उपयोग स्वत:सह इतरांना ज्ञानी' होण्यासाठी केला. यामुळे त्यांच्या अमोघ वक्तृत्वाचा सुगंध संपूर्ण जगभरात दरवळत राहिला. वाणीचा सुगंध दरवळणाऱ्या वक्तव्याची लेखणीही तेवढीच कसदार असलेली दिसून येते. दैनिक सकाळ वृत्तपत्राचे तत्कालीन संपादक श्री.विजय कुवळेकर यांच्या अग्रहाखातर त्यांनी इ.स.१९९३ साली दीपस्तंभ' हे सदर लेखन करून युवकांच्यापुढे महापुरूषांची चरित्रे अत्यंत सोप्या भाषेत मांडले. यामधूनच पुढे दीपस्तंभ (१९९४), यक्षप्रश्न (१९९८), मुक्तीगाथा महामानवाची (१९९८), जागर खंड-१ (२००२), जागर खंड-२ (२००३), कथा वक्तृत्वाची (२००३), हितगोष्टी (२००४), देशोदेशीचे दार्शनिक (२००५), प्रेरणा (२००५), जीवनवेध (२००९), स्वामी-विवेकानंद (चरित्र-चिंतन) या ग्रंथ लेखनातील अलौकिक आणि अर्थपूर्ण शब्द शैलीतील विषयविचार एका सिध्दहस्त लेखकाची लेखकाची साक्ष देतात. ग्रामजीवनाचा सहवास लाभल्याने आध्यात्माचा वसा जोपासतांना त्यामधील वैज्ञानिकताही पारखून घेतलेली दिसते. त्याचबरोबर राजकीयसत्ता आणि संपत्ती यांच्या मोहापासून अलिप्त राहून त्यांनी एक नैतिकआदर्श निर्माण केला होता. अशा प्रकारे लोकांतात राहून एकांतात रममाण होणारे प्रेमळ, शिस्तप्रिय, वक्तशीर, तत्वनिष्ठ, विलक्षण बुध्दिमत्ता, विवेकशीलता, विनम्रता, प्रयोगशीलता, नैतिकता आणि राजकीय अलिप्तता बाळगणारे प्राचार्य शिवाजीराव हे आजच्या विद्यार्थी,पालक आणि शिक्षक यांच्यासाठी आदर्शाचा वस्तूपाठ होते. अशा ज्ञानपरायण,तत्वनिष्ठ वैखरीच्या वाटसरूचा आज जन्मदिन त्यानिमिताने सरांच्या विवेकशील विचारांचा जागर'.

(लेखक औरंगाबाद येथील शिवछत्रपती महाविद्यालयात मराठी विभागात प्राध्यापक आहेत.)

# एक आत्महत्या, अनेक प्रश्न

**राज्य शासनाच्या उदासीन, दिरंगाईमुळे महाराष्ट्र लोक सेवा आयोगाची परीक्षा पास होवून देखील नोकरी मिळत नाही, हा मनस्ताप संवेदनशील स्वप्निल सुनिल लोणकर (वय २४ वर्ष) सहन झाला नाही, अखेर या होतकरू युवकाने आपली जीवनयात्रा संपवून टाकली, मनाला जबर चटका देणारी ही दुर्देवी घटना, त्याची आई श्रीमती छाया लोणकर यांनी आपल्या दुःखाला वाट करून देताना तीव्र भावना व्यक्त केल्या, माझा सरकारला तळतळाट आहे, एखाद्या मंत्र्याच्या मुलाने आत्महत्या करावी, त्याशिवाय मुलगा जाण्याचे दुःख काय असते हे शासनाला कळणार नाही, असा हंबरडा या माऊलीने आपला शोक व्यक्त केला, सरकारने इतर पालकाचा विचार करावा, माऊली शोकाकूल भावनेने सांगते.**

आज-काल

संतोष मुळी




आज मी माझा हुशार, होतकरू मुलगा गमावला, नव्हे सरकारने त्यास आत्महत्या करण्यास प्रवृत केले असा त्यांनी आरोप केला आहे, या त्याच्या भावना सर्वानाच हेलावून टाकतात, आपण लोकसेवा आयोगाच्या परीक्षा बाबत आढावा घेतला तर. लक्षात येते, तरूण मुले/मुली या एमपीएससी परीक्षेत क्षमता प्राप्त करण्यासाठी दिवस-रात्र अभ्यास करून पास होण्यासाठी धडपड करतात, लाखो मुले-मुली या जीवघेणी स्पर्धेत कष्टाची बाजी लावून आपले यश आजमावतात, या परीक्षाचे नियोजन चोख होण्याची नितांत गरज आहे, लोकसेवा आयोगा संदर्भात गेले काही वर्षातील शासकीय दिरंगाई, राजकीय उदासीनता, अनास्थामुळे तरूणाचे भविष्य धुळीस मिळते, नव्हे तरूण आत्महत्या करतात, आज आयोगाने घेतलेल्या परीक्षेतील नियुक्ती पत्राची प्रतीक्षा हजारो तरूण करत आहेत, गेल्या दोन वर्षात घेतलेल्या मुख्य व मुलाखत नियुक्तीचे पत्र नाही. अशा विविध टप्पावरील आठ ते दहा हजार उमेदवार नोकरीच्या प्रतीक्षेत आहेत, या मध्ये वर्ग १ ते वर्ग ३ ची सरकारी पदे असून आता आपणाला नोकरी मिळणार हे स्वप्न रंगवीत प्रतीक्षा करीत आहेत. सामान्य, मध्यवर्गीय घरातील असे 'स्वप्निल' आपल्या कष्टाचे चीज झाले असे म्हणत प्रतीक्षा तरी किती करणर, यासाठी राज्य शासनाने केवळ घोषणा बाजी न करता प्रत्यक्ष पदभरती करण्याची गरज आहे. 'महाराष्ट्र लोकसेवा आयोगा'ची रखडकथा आपण या आयोगाच्या सदस्याच्या रिक्त जागा आहेत, त्या भरणे बाबतची घोषणा अधिवेशनात मा.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली, यासाठी होतकरू, गुणवंत युवक स्वप्निल लोणकर यास आपले प्राण अर्पण करावे लागले. केवळ सरकारी अनास्थामुळेच आयोगाच्या आज ज्या रिक्त जागा आहेत, त्या तीन वर्षांपासून भरलेल्या नाहीत, ज्यांच्या मान्यतेने अध्यक्ष व सदस्य यांची नेमणूक केली जाते.त्या मा.राज्यपालांनी तब्बल सात महिन्यांपूर्वी या संदर्भात मुख्यमंत्र्याना पत्र पाठविले होते, त्या पत्राची सरकारने दखल घेतली नाही, या पत्रानुसार सरकारने दखल घेतली असती तर 'स्वप्निल'ची आत्महत्या झाली नसती, आस्था नसलेल्या शासनाने दिरंगाईचे धोरण कायम ठेवले, त्याची जबर किंमत लोणकर कुंटूबियाना द्यावी लागली. आज लोकसेवा आयोगाचा कारभार दोनच सदस्य सांभाळत आहेत, एक आयोगाचे अध्यक्ष मा.सतिश गवई असून त्यांची मुदत येत्या २९ ऑगस्टला संपते. दुसरे एकमेव सदस्य मा.द.स.मेश्राम यांचा कार्यकाळ येत्या ७ डिसेंबरला संपणार आहे. या दोन सदस्यावर आयोगाचे कार्यभार चालतो. मुलाखत घेणे असल्या या दोघांचेच पॅनेल असते.

अशा स्थितीत निवड प्रक्रियाचे कामकाज रेंगाळू शकते. महाराष्ट्र लोकसेवा आयोग स्वायत्त आहे. सहा सदस्य आयोगात असतात, आज दोनच सदस्य कारभार सांभळतात. अपुरे मनुष्यबळ असल्याने त्याचा परीणाम स्पर्धा परीक्षावर होतो. नियुक्ती प्रक्रिया लांबणीवर पडते. आताच्या अनभवी महाविकास आघाडी सरकारने देखिल आयोगाच्या समस्याबाबत फारशी नोंद घतली नाही, ही आहे रखडकथा. ग्रामीण भागातील गुणवंताची स्वप्ने अपुरी राहणार? 'स्वप्निल'च्या आत्महत्यानंतर ग्रामीण परीसरातील विद्यार्थी, पालक वर्गात तणाव व अस्वस्थता निर्माण होत आहे. या स्पर्धा परीक्षेत यश मिळवण्यासाठी आर्थिक ओढाताण करून अखेरच्या क्षणी विपरीत घडत असेल. तर या घटनेमुळे सामान्य पालक चिंतीत होत आहे. मग नको ते अधिकारी पद गावातच काहीतरी करू. विशेषतः मुलींच्या बाबत ही समस्या मोठ्या प्रमाणावर येऊ शकते. आज तब्बल अडीच लाख पेक्षा जास्त मुले-मुली ग्रामीण भागातील स्पर्धा परीक्षेत यशवंत होण्यासाठी मेहनत घेत आहेत. त्याची आधिकारी होण्याचे स्वप्न अपूर्ण राहू नये, याची दखल शासनाने गांभीर्याने घ्यावी. शासनाचा राज्यकारभाराचा रथ या आयोगामार्फत नियुक्त गुणवंत तरूण मंडळीच्या सहकार्यानेच चालतो. हा तरूण/तरूणी होतकरू सक्षम, गुणवंत असल्यास राज्य शासनाची वाटचाल गतिमान प्रगतीशील होणेसाठी, स्वायत संस्था, शैक्षणिक संस्था परीपूर्ण असाव्यात. जरी एक आत्महत्या झालेली असली तरी अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. याचे राज्यकर्त्यांनी भान ठेवायला हवे.

(लेखक माजलगावस्थित जेष्ठ पत्रकार आहेत.)

## जलसंस्कृतीचे जनक : शंकरराव चव्हाण

दिवंगत माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी आपल्या ५० वर्षाच्या सक्रीय राजकारणात त्यांनी स्वच्छ आणि शुद्ध चारित्र्याला आपार महत्त्व दिले. महाराष्ट्रा बरोबरच देशाच्या राजकारणातही ठसा उमटवणाऱ्या माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या कार्याबद्दल थोडक्यात जाणून घेऊयात.



कोणताही राजकीय वारसा नसताना शंकरराव चव्हाण यांनी शून्यातून विश्व निर्माण केले. त्यांच्या राजकीय कार्यकर्तृत्वाची कमान सदैव वाढती राहिली. महाराष्ट्राचे पाटबंधारे मंत्री आणि मुख्यमंत्री म्हणून त्यांनी जो ठसा महाराष्ट्राच्या पाटबंधारे क्षेत्रावर उमटविला, तो काळालाही मिटविता येण्यासारखा नाही. शंकरराव चव्हाण यांनी विविध लघु, मध्यम व मोठे पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करून कोरडवाहू शेतीत रात्रंदिवस राबराब राबणाऱ्या शेतकऱ्यांच्या जीवनात हरितक्रांती घडविली. शंकरराव चव्हाण यांनी विष्णुपुरी प्रकल्प योजना आणि जायकवाडी प्रकल्प या योजना अनेक अडचणींवर मात करून पूर्णत्वास नेल्या. या प्रकल्पांबरोबरच कोयना, वारणा, दूधगंगा, निम्न तेरणा, दुधना, अप्पर पैनगंगा, मांजरा, पूर्णा, मुळा, काळमावाडी, गिरणा इ.पाटबंधारे प्रकल्पांच्या कालव्यांतून वाहणारे पाणी शंकररावांच्या कर्तृत्वाची गाणी आजही गात आहे. या क्षेत्रात त्यांनी जो ठसा उमटविला, हे प्रकल्प सिद्धीस नेण्यासाठी शंकरराव चव्हाण यांनी जे प्रयत्न केले, त्यामुळे महाराष्ट्राच्या 'जलसंस्कृतीचे जनक' असाही त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात येतो, तो अगदी यथार्थ आहे. महाराष्ट्राची विधानसभा, विधानपरिषद, लोकसभा आणि राज्यसभा या चारही प्रतिनिधीगृहांचे सन्माननीय सभासद राहिलेले आणि तेथून मंत्रिमंडळात जाणारे शंकरराव चव्हाण हे एक अपवादात्मक लोकप्रतिनिधी होते.

आधुनिक विचारांचे
# वर्तमान

## तुमच्या खासदाराचे कामकाज आता थेट मोबाईलवर



नवी दिल्ली : जागरूक नागरिकांसाठी एक खुशखबर आहे. आता तुम्ही निवडून दिलेल्या खासदारांचे थेट संसदेतील काम तुम्ही तुमच्या मोबाईलवर पाहू शकता. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी, संसदेशी निगडीत जास्तीत जास्त माहिती नागरिकांपर्यंत पोहचवण्यासाठी एक मोबाईल ॲप तयार करण्याचे काम सुरू असल्याचे सांगितले आहे. या ॲपवर नागरिकांना लोकसभेचे कामकाज लोकसभा टीव्हीच्या लाईव्ह प्रसारणाद्वारे आपल्या मोबाईलवर पाहता येईल. तसेच संसदेचे जुने कामकाज आणि त्याच्याशी निगडीत कागदपत्रांचाही यात समावेश असेल.



बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
9423209823
मुख्यालय : 'शिवगड' २३,
मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड

# भाजप सोडण्याचा प्रश्नच नाही!

## पंकजा मुंडे यांची भूमिका; धर्मयुद्ध टाळण्याचेही समर्थकांना आवाहन



प्रतिनिधी

मुंबई : भाजपचे सर्वोच्च नेते नरेंद्र मोदी, अमित शाह, जे.पी.नड्डा यांच्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. भाजप मला घरासारखे आहे. भाजप सोडण्याचा प्रश्न नाही, असे स्पष्टीकरण भाजपच्या राष्ट्रीय सचिव तथा माजी मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांनी मंगळवारी माध्यमांशी बोलताना दिले. दरम्यान, केंद्रीय मंत्री मंडळ विस्तारात बीडच्या खासदार डॉ.प्रितम मुंडे यांना डावलण्याने मुंडे समर्थकांमध्ये नाराजी पसरली होती. या पार्श्वभूमीवर दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांनी पंकजा मुंडे यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर नाराज कार्यकर्त्यासमोर पंकजा मुंडे यांनी आपली भूमिका मांडली.

'यावेळी समर्थकांना समजावताना पंकजा मुंडे म्हणाल्या, पाच पांडव का जिंकले कारण त्यांच्याकडे संयम होता. जो चांगला असतो तो युद्ध टाळण्याचा प्रयत्न करतो. मी धर्मयुद्ध टाळण्याचा प्रयत्न तोवर करते जोवर शक्य आहे. मी कुणालाही भीत नाही, निर्भय राजकारणाचे माझ्यावर संस्कार आहेत. मी माझ्यापेक्षा वयाने मोठ्या असणाऱ्यांचा कधीही अनादर केला नाही. मी निर्भय आहे ते तुमच्याच जीवावर. एक व्यक्ती स्वतःचा विचार करून काहीही मिळवू शकतो. मला माझ्यासाठी काही नको, तुमच्यासाठी हवे आहे. हे धर्मयुद्ध टाळण्यासाठी माझे ऐका, आपण कष्टाने बनवलेले घर का सोडायचे. ज्या दिवशी छत अंगावर पडेल त्यादिवशी बघू', असेही यावेळी पंकजा मुंडे म्हणाल्या.

पंकजा मुंडे म्हणाल्या, माझा नेता मोदी... माझा नेता अमित शाह... आणि माझा नेता जे.पी. नड्डा हे आहेत. त्यांच्या मनात माझ्याबद्दल चांगले विचार आहेत, असा मला विश्वास आहे. आपण कष्टाला घाबरत नाही. कोयता घेऊन कामाला जाऊ. आपल्याला काय, मला माझ्यासाठी काही नको. मला प्रितमसाठी काही नकोय. मला भाजपने अर्ज भरायला लावला होता. पण, ते मला म्हणाले तुम्हाला देणे शक्य नाही. मी म्हणाले धन्यवाद. नंतर रमेश कराडांचे नाव आले, काय बिघडले? मी कोण आहे...? तुम्ही तर प्रोटोकॉलने माझ्यापेक्षा मोठे आहात. मी तुमच्यापेक्षा छोटी आहे, मला सजवण्याचा प्रयत्न करू नका, असेही पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या. माझा निवडणुकीत पराभव झाला. आज माझ्याकडे पदाचा अलंकार नाही. स्वाभिमानी राजकारण केले. पंतप्रधानांनी मला झापल्याचे वृत्त काही माध्यमांनी चालवले. मात्र माझ्या चेहऱ्यावर तसे काही दिसते का असा सवाल करत, मला पंतप्रधान मोदींनी कधीही अपमानित केले नाही. मला माझ्या राष्ट्रीय नेत्यांनी कधी अपमानित केले नाही. असेही पंकजा म्हणाल्या. यावेळी पंकजा मुंडे यांनी नाराज समर्थकांना कौरव आणि पांडवांचे महाभारतातील उदाहरणही दिले आणि पांडव का जिंकले आणि कौरव का पराभूत झाले, हेही समजावून सांगितले तसेच, आपले घर आपण सोडायचे नाही, असेही पंकजा मुंडे यांनी यावेळी समर्थकांना सांगितले.

## फास्टट्रॅकन्यूज

### बीडच्या लॉकडाऊन नियोजनाचा आंतरराष्ट्रीय पातळीवर अभ्यास



बीड : गेल्या पावणे दोन वर्षापासून देशामध्ये कोरोनाचा संसर्ग सुरू आहे. पहिल्या लाटेमध्ये बीड जिल्ह्यातील कोरोनाचे नियोजन तत्कालीन पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार यांनी अत्यंत चांगल्या पद्धतीचे केले होते. या नियोजनाची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेण्यात आली. न्यूयॉर्क येथील कोलंबिया स्कूल ऑफ इंटरनॅशनल ॲण्ड पब्लिक अफेअर्सच्या माध्यमातून आता आंतराष्ट्रीय अभ्यासाचा विषय झाला आहे. विशेष म्हणजे जिल्ह्यातून ऊसतोडणीसाठी जिल्हाबाहेर गेलेले ७० हजार ऊसतोड कामगार एप्रिल, मे मध्ये परतले. या मजुरांच्या माध्यमातून कोरोनाचा फैलाव होऊ नये यासाठी ६ जिल्ह्यांना भिडणाऱ्या सिमावर ३०० हून अधिक अंतर जिल्हा रस्ते शोधून ते सील करण्यात आले होते. जागोजागी परतणाऱ्या ऊसतोड मजुरासाठी तालुकास्तरावर मजुरांच्या राहण्याची आणि जेवणाची व्यवस्थाही करण्यात आली होती.

### 'केवळ गडकरींमध्ये सामाजिक प्रश्नी आवाज उठवण्याची धमक'



नवी दिल्ली : मोदी सरकारमध्ये केवळ केंद्रीय मंत्री नितीन गडकरींमध्ये आवाज उठवण्याची हिंमत आहे, असे माजी केंद्रीय मंत्री आणि काँग्रेसचे वरिष्ठ नेते पी चिदंबरम म्हणाले. पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या दरांवर नितीन गडकरींनी केलेल्या टिप्पणीवर चिदम्बरम यांनी ही प्रतिक्रिया दिली. गडकरींमध्ये धमक आहे. यामुळे त्यांनी कॅबिनेटमध्ये आपला बुलंद करायला हवा, असे चिदंबरम म्हणाले. पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या दरांमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असल्याचे गडकरींनी एका जाहीर कार्यक्रमात स्वीकार केले होते. नितीन गडकरी वेळोवेळी आपला आवाज उठवत असतात. पण सध्या तेही गप्प आहेत. त्यांनी आपला आवाज उठवला पाहिजे. त्यांनी कॅबिनेटमध्ये आपला आवाज बुलंद केला पाहिजे, असे चिदंबरम म्हणाले.

### नीट पीजी परिक्षा ११ सप्टेंबरला होणार

दिल्ली : पदव्युत्तर पदविका अर्थात पीजी डिप्लोमा अशा अभ्यासक्रमांसाठी घेतली जाणारी नीट पीजी परीक्षा ११ सप्टेंबरला घेतली जाणार असल्याचे मंगळवारी केंद्रीय आरोग्य मंत्री मनसुख मांडवीय यांनी जाहीर केले आहे. मंगळवारपासून अर्थात १३ जुलै रोजी संध्याकाळी ५ वाजेपासून या परीक्षेचे अर्ज देखील संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या घोषणेमुळे या परीक्षांची वाट पाहणाऱ्या विद्यार्थ्यांचा जीव भांड्यात पडला आहे. मागील वर्षभरापासून कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्वच परीक्षांचे भवितव्य अधांतरी झालेले असताना केंद्रीय आरोग्यमंत्र्यांनी केलेल्या या घोषणेमुळे हा मोठा दिलासा मानला जात आहे.

### मोरेवाडी-सुर्डी पुलावरून तरूणाचा वाहून करूण अंत

वडवणी : मामाला माजलगावला सोडून येताना २२ वर्षीय भाच्याचा नदीच्या पुरात वाहून दुदैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. सदरील घटना मंगळवारी सकाळी उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे. पिंपळनेर ता.जि.बीड येथील २२ वर्षीय मयुर विश्वनाथ थोरात हा युवक काल स्वताच्या दुचाकीवरुन मामाला माजलगाव येथे सोडण्यासाठी गेला होता. परत येतांना पावसामुळे मोरेवाडी-सुर्डी पुलाजवळ येताच पुलावरुन पाणी वाहत असताना आणि पाण्याचा ओघ लक्षात न आल्याने मयुर थोरात यांचा दुचाकीवरुन तोल गेला आणि यामध्ये त्याचा दुदैवी मृत्यु झाला.

# आघाडी शासनाच्या विकास कामांची माहिती तळागाळापर्यंत पोहचविणार

## शिवसेना जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव यांची माहिती; शिवसंपर्क अभियानास प्रारंभ

प्रतिनिधी

माजलगाव : शिवविचाराने प्रेरित होऊन शिवसंपर्क अभियान जिल्हाभरात प्रभावीपणे राबविणार आहे, अशी माहिती शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव यांनी दिली. राज्यात मराठी माणसाचा स्वाभिमान जागा करत त्यांना एकत्र करण्यासाठी शिवसेना दि.१२ ते २४ जुलै दरम्यान शिवसंपर्क अभियान राबवत आहे. त्यानिमित्त शहरात आयोजित कार्यक्रमात शनिवारी अप्पासाहेब जाधव बोलत होते. दरम्यान, शासनाच्या विकासकामांची माहिती तळागाळापर्यत पोहोचविणार असल्याची माहिती जाधव यांनी 'वर्तमान'शी बोलताना दिली. वडवणी तालुक्यातील कवडगाव येथून सोमवारी शिवसंपर्क अभियानास प्रारंभ झाला.



शिवसेना जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव म्हणाले, राज्यात महाविकास आघाडी शासनाची चांगली कामगिरी आहे. बेरोजगारांसाठी नवीन नोकर भरती, शेतकऱ्यांसाठी वेगवेगळ्या योजना, महात्मा फुले आरोग्य योजनेद्वारे आरोग्याचे प्रश्न सोडवणे, सर्वसामान्य माणसांना चांगले जीवन जगता यावे, यासाठी विविध प्रकारे मदत करणे ही कामे शासन करत आहे. त्या सर्व योजनांची आणि कामांची माहिती सामान्यांपर्यत घेऊन जाण्यासाठी हे अभियान आहे. यावेळी जिल्हा समन्वयक संजय महाद्वार, उपजिल्हाप्रमुख रामराजे सोळंके, शिवाजी कुलकर्णी, पप्पू ठक्कर, रामदास ढगे, अशोक गाढवे, अतुल दुबे, नगरसेवक अशोक आळणे, रत्नाकर शिंदे, व्यंकटेश शिंदे, संदिप माने, अर्जुन वाघमारे, बाळासाहेब कुरूंद, अनिल बडे, गजानन मुडेगावकर, धनंजय सोळंके, राजेश विभूते, राजा पांडे, तुकाराम येवले, माऊली गोंडे, सुनिल खंडागळे, दासू बादाडे, प्रभाकर धरपडे, नामदेव सोजे, शरद शिंदे, लक्ष्मण सोळंके, नारायण तौर, संजय शिंदे, नारायण चारबोले, महादेव वैराळे आदींची उपस्थिती होती.

# वयोवृद्धांसाठी 'शरद शतम' योजना

## सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे यांची घोषणा

प्रतिनिधी



परळी : कुटुंबातील ज्येष्ठ नागरिकांना काही आजार उद्भवले तरच आपण दवाखान्यात घेऊन जातो, परंतु त्यांची नियमित आरोग्य तपासणी होणे व एखाद्या आजाराचे वेळीच निदान होणे गरजेचे आहे, याचाच विचार करून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत वयोवृद्ध व्यक्तींची वर्षातून किमान एकदा मोफत आरोग्य तपासणी करता यावी यासाठी 'शरद शतम' ही योजना शासन स्तरावर प्रस्तावित केली असून लवकरच या योजनेला मूर्त स्वरूप देणार असल्याचे सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांनी घोषित केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २२ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून पक्षाचे सर्वेसर्वा तथा खासदार शरदचंद्र पवार यांच्या संकल्पनेतून 'महाराष्ट्रवादी चर्चा' हा फेसबुक लाईव्ह च्या माध्यमातून मंत्री व जनता असा थेट संवाद घडवण्याचा उपक्रम सुरू आहे. या उपक्रमांतर्गत शनिवारी धनंजय मुंडे यांनी राज्यातील जनतेशी फेसबुक लाईव्ह द्वारे संवाद साधला. या संवादादरम्यान मंत्री मुंडे यांनी शरद शतम या प्रस्तावित योजनेची माहिती दिली व लवकरच ही योजना कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचेही सांगितले. प्रत्येक महिन्याला आपल्या विभागामार्फत केलेल्या कामकाजाचा जनतेसमोर अहवाल सादर करणारे एकमेव मंत्री म्हणून धनंजय मुंडे ओळखले जातात. आज या कार्यक्रमाच्या माध्यमातून मंत्री पदाचा पदभार स्वीकारल्यापासून केलेल्या कामकाजाचा व विविध निर्णयाचा लेखाजोखा त्यांनी पुन्हा एकदा जनतेसमोर मांडला आहे.

## नव्या कॅबिनेट मंत्र्यांना शुभेच्छा!



नवी दिल्ली : देशाच्या केंद्रीय मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री म्हणून नारायण राणे यांचा समावेश झाल्याबद्दल शुभेच्छा देताना भाजपाचे युवा नेते धनराज मुंडे आदी.

# आर्य वैश्य महासभेमार्फत दिशादर्शक कार्य करू

## नवे बीड जिल्हाध्यक्ष सुमित रूद्रवार यांची ग्वाही

प्रतिनिधी



माजलगाव : बीड जिल्ह्यात आर्य वैश्य महासभेच्या माध्यमातून उल्लेखनीय आणि दिशादर्शक कार्य करू अशी ग्वाही नवनियुक्त जिल्हाध्यक्ष सुमित विकासराव रूद्रवार यांनी दिली.

बीड जिल्हा आर्य वैश्य महासभेची बैठक रविवार रोजी बीड येथील अन्विता हॉटेलच्या सभागृहात झाली. यावेळी सर्वानुमते जिल्हाध्यक्षपदी सुमित रूद्रवार यांची निवड करण्यात आली. तसेच कार्याध्यक्षपदी सुर्यकांत महाजन (बीड), कोषाध्यक्षपदी वैभव झरकर (परळी वैजनाथ), सचिवपदी अभय भावठाणकर (किल्लेधारूर), सहसचिवपदी सचिन पिलाजी (केज), सहकोषाध्यक्षपदी राम हराळे (अंबाजोगाई), हिशोब तपासणीसपदी सीए समीर शेटे (किल्लेधारूर), सल्लागारपदी रविकिरण गडम (माजलगाव), समन्वयकपदी माणिक शेटे (माजलगाव), नागनाथ पारषेवार (परळी वैजनाथ) यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. नवनियुक्त जिल्हाध्यक्ष सुमित रूद्रवार म्हणाले, आर्य वैश्य महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष नंदकुमार गादेवार यांनी माझ्यावर सोपवलेली जबाबदारी योग्यरीत्या पार पाडेल.

आमच्या नवनियुक्त पदाधिकारी सर्वावर टाकलेली जबाबदारी आणि दाखवलेला विश्वास आम्ही जिल्हावासियांच्या सहकार्याने भरीव चांगली कामगिरी करून आर्य वैश्य महासभा बीड जिल्ह्याचे नाव आणखी उंच पातळीवर नेण्याचा प्रामाणिकपणे निष्ठापूर्वक प्रयत्न करणार, जिल्ह्यात संघटनात्मक बांधणीवर भर देणार असल्याचेही रूद्रवार म्हणाले. आर्य वैश्य महासभेच्या झालेल्या बैठकीत समन्वयक म्हणून लाभलेले विकास दुबे, अभय कोकड, महासभेचे संस्थापक अध्यक्ष गजानन दुबे, संजय दुबे यांचे आभार मानले.

# अश्विनी तिडकेंच्या मदतीला धावली शिवसेना

## वैद्यकीय मदत कक्षामार्फत उपचारासाठी आर्थिक मदत

प्रतिनिधी

माजलगाव : दुर्धर आजाराशी सामना करत असलेल्या चाटगाव (ता.धारूर) येथील अश्विनी रमेश तिडके यांना उपचार आणि औषधीसाठी शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाने मदतीचा हात दिला आहे.

धारूर तालुक्यातील मौजे चाटगाव येथील अल्पभूधारक शेतकरी रमेश तिडके यांच्या पत्नी सौ.अश्विनी या दुर्धर आजाराशी गेल्या कित्येक महिन्यांपासून लढा देत आहेत. तिडके यांना महिन्याला दहा ते बारा हजार रूपये खर्च येतो. महिन्याकाठी एवढी रक्कम तिडके यांना पेलणे शक्य नाही. अशा परिस्थितीत तिडके यांनी शिवसेना



पती रमेश तिडके समवेत सौ.अश्विनी तिडके.

वैद्यकीय मदत कक्षाकडे विनंती अर्ज करून मदतीची मागणी केली होती.

त्यानुसार शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाने या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून अश्विनी तिडके यांना उपचार आणि औषधीसाठी आर्थिक मदत केली आहे. अश्विनी तिडके यांना दुर्धर आजार असून त्यांच्या शरीरात पुरेसे रक्त तयार होत नाही. त्यासाठी औरंगाबाद येथील जीवनअमृत हॉस्पिटलमध्ये त्या उपचार घेत आहेत. सध्याच्या महागाईच्या काळात तिडके कुटुंबीयांना महिन्याला लागणारी रक्कम भरणे जिकीरीचे झाले आहे. ही बाब शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाने लक्षात घेवून जीवनअमृत हॉस्पिटलला संबंधित रक्कम जमा करून सामाजिक दायित्व स्विकारले आहे. महाराष्ट्र राज्यात शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाने व्यापक काम उभा केले असून शेकडो गरजवंत व गरिब रूग्णांना मदतीचा हात दिला आहे. शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष आणि डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशन संयुक्त विद्यमाने अनेक उपक्रम राबवून आरोग्य क्षेत्रात भरीव कार्य करत आहे. मिळालेल्या मदतीबद्दल अश्विनी तिडके यांचे पती रमेश तिडके यांनी राज्याचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे आणि सर्व टीमचे धन्यवाद मानले आहेत.

# अखेर धारूर बाजार समिती भाजपकडे

## सभापतीपदी अपेक्षितपणे सुनिल शिनगारे यांची वर्णी



▶ प्रतिनिधी

धारूर : धारूर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती पदाच्या निवडणुकीत भाजपाचे सुनिल शिनगारे यांनी बाजी मारली असून ही संस्था ताब्यात ठेवण्यात भाजपने यश मिळवले आहे. या निवडीनंतर कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला.

धारूर बाजार समितीचे संचालक मंडळाची मुदत नऊ महिने राहिली आहे. ही संस्था भाजपाच्या ताब्यात आहे. सभापती महादेव बडे यांच्या अकाली निधनाने हे पद रिक्त झाले होते. येथील सभापती निवडीसाठी सहायक निबंधक मोटे यांच्या उपस्थितीत बैठक होऊन सभापतिपदासाठी भाजपाकडून विद्यमान उपसभापती सुनिल शिनगारे व माजी उपसभापती महादेव तोंडे यांचे अर्ज दाखल करण्यात आले, तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून चंद्रकांत लगड यांचा अर्ज दाखल करण्यात आला होता. भाजपातील अंतर्गत गटबाजीचा फायदा घेता येईल का, या हेतूने हा अर्ज दाखल करण्यात आला. मात्र, निवडणुकीत प्रत्यक्ष भाजपाकडून विद्यमान उपसभापती सुनिल शिनगारे यांचा अर्ज ठेवण्यात आला. महादेव तोंडे यांचा अर्ज मागे घेण्यात आला.

भाजपाचे सुनील शिनगारे व राष्ट्रवादी काँग्रेसचे चंद्रकांत लगड यांच्यामध्ये सरळ लढत झाली. गुप्त मतदान पद्धतीने मतदान घेण्यात झाले. भाजपाचे सुनिल शिनगारे यांना दहा, तर राष्ट्रवादी काँग्रेसचे चंद्रकांत लगड यांना सात मते मिळाली.

पक्षीय बलाबलानुसार मतदान पडल्याने संस्था भाजपाच्या ताब्यात ठेवण्यात यश आले. धारूर कृषी उत्पन्न बाजार समिती राखून ठेवण्यात भाजपला यश आले असून सभापतीपदी अपेक्षितपणे सुनिल शिनगारे यांची वर्णी लागली आहे.







## टिसी हरवला आहे

महेश रघुनाथ बोटवे, रा.माजलगाव ता.माजलगाव, जि.बीड यांचा माजलगाव ते बीड प्रवासादरम्यान १२ वी पासचा टिसी हरवला आहे. तरी कोणाला सापडल्यास संपर्क साधावा.

संपर्क : ७४१०७६८८००













आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.